नं. २ ता. १८-२-९०

सत्यवादी पान नं. ३ ता. १९-२-१९९०

# कमला कॉलेजचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

कोल्हापूर, ता १८-- येथील ताराराणी विद्यापीठ संचलित कमला कॉलेजचा पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे अध्यक्ष डॉ व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे प्राचार्य एम. आर. देसाई यांच्या हस्ते पार पडला.

प्रारंभी कॉलेजचे प्राचार्य डॉ. शांतीकुमार पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्राचार्य एम. आर. देसाई यांनी आपल्या संदेशपर; अभ्यासंपूर्ण व्याख्यानात जीवनातील ज्ञानप्रेम जोपासणेचे महत्व स्पष्ट केले.

कॉलेजच्या कु. नंदा भोसलेचा यावर्षी दिल्ली येथील २६ जानेवारीच्या संचलनासाठी उत्कृष्ट छात्रसैनिक म्हणून निवड झाल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तिचा व कु. राजनंदा देशमुख ही दोरीवरील मल्लखांबचे दिल्ली येथे प्रात्यक्षिक करण्यास निवडली गेली होती तिचाही सत्कार यावेळी करण्यात आला. त्यानंतर विविध क्षेत्रात उत्कृष्ट यश संपादन केलेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रा. पी. बी. शिंदे यांनी आभार मानले.